**आकाशवाणी मुंबई**

**राष्ट्रीय बातम्या देत आहे.**

**ठळक बातम्या**

महाराष्ट्रात साडेतीन हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या कामांसाठी ६ हजार ४२९ कोटी रुपयांच्या तरतुदीला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

लाडकी बहीण योजनेत अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांकडून पैसे परत घेणार नसल्याचं मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण

कांद्याला तीन हजार रुपये प्रति क्विंटल हमीभाव आणि इतर मागण्यांसाठी महाविकास आघाडीचं आंदोलन

गुजरातमधे महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या दोन बस एकमेकांना धडकून झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू, १५ जखमी

**आणि**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस येत्या गुरुवारच्या आसपास केरळममधे पोचण्याचा हवामान विभागाचा अंदाज /राज्याच्या चारही विभागांमधे पावसाची शक्यता

**मुख्यमंत्री /लाईव्ह /कौस्तुभ**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून वगळल्या गेलेल्या लाभार्थींना कागदपत्रांची संपूर्ण छाननी केल्यानंतरच अपात्र ठरवल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. लाडकी बहीण योजनेच्या सुरुवातीला कागदपत्रं सादर करायला वेळ लागेल, हे लक्षात घेता, लाभार्थ्यांनी स्वतः दिलेली माहिती गृहित धरून त्यांना योजनेचा लाभ देण्यात आला. मात्र त्यानंतर या योजनेचं लेखापरीक्षण झाल्यावर लाभार्थ्यांपैकी पाच लाख महिलांच्या कुटुंबात सरकारी नोकरदार व्यक्ती असल्याचं उघड झालं, तसंच दहा लाख महिलांचं उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त असल्याचं समोर आलं, त्यामुळे त्या सर्व लाभार्थी अपात्र ठरल्या. तसंच १४ हजार पुरुषांनी या योजनेसाठी अर्ज केल्याचं आढळलं. त्यांनाही अपात्र ठरवण्यात आलं, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. त्यानंतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या १ कोटी ७० लाख महिला योजनेसाठी पात्र ठरल्याचं ते म्हणाले. अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना आता पैसे दिले जाणार नाहीत, मात्र आतापर्यंत मिळालेले पैसे परत घेतले जाणार नाहीत असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री (२१ सेकंद)**

**लाबयो- पाटील/ पीटीआय/ गौरी**

लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी करताना कागदपत्रांची छाननी योग्य रीतीने करण्याची काळजी सरकारनं घ्यायला हवी होती, मात्र सरकारनं केवळ निवडणुकीवर डोळा ठेवून निधीचं वाटप केल्याचा आरोप राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी केला आहे. ८० लाख लाभार्थी अपात्र असताना दरमहा दीड हजार रुपये प्रमाणे गेले २० महिने सुमारे २४ हजार कोटी रुपये त्यांना वाटले गेले, याची जबाबदारी सरकारनं घेतली पाहिजे, अशी मागणी पाटील यांनी केली आहे

**मंत्रिमंडळ निर्णय /मशा /सुनील**

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३ अंतर्गत साडेतीन हजार किलोमीटर लांबीचे रस्ते आणि पुलांच्या कामांसाठी ६ हजार ४२९ कोटी रुपयांच्या तरतुदीला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. या योजनेसाठी एआयआयबी, अर्थात आशियाई पायाभूत सुविधा गुंतवणूक बँकेकडून ५० कोटी अमेरिकी डॉलर्स, म्हणजे सुमारे ४ हजार ५०० कोटी रुपये कर्ज मिळणार आहे. तर राज्य शासन ३० टक्के हिस्सा म्हणून सुमारे १ हजार ९२९ कोटी रुपये उपलब्ध करून देणार आहे.

**सपकाळ /पत्रक -०२ नांदेड ०६/कौस्तुभ**

कांद्याला तीन हजार रुपये प्रति क्विंटल हमीभाव द्यावा, नाफेडमार्फत कांद्याची खरेदी करावी आदी मागण्यांसाठी महाविकास आघाडीनं आज पुणे जिल्ह्यातल्या आंबेगाव तालुक्यात पुणे - नाशिक महामार्गावर रास्तारोको आंदोलन केलं. त्यामुळे कांद्याची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फतच करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी केली. राष्ट्रवादी काँग्रेस शऱदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशीकांत शिंदे, आमदार बापुसाहेब पठारे, बाबाजी काळे आदी नेत्यांसह शेतकरी मोठ्या संख्येनं या आंदोलनात सहभागी झाले होते.

**म्यानमां अध्यक्ष आगमन/ पूल/गौरी**

म्यानमाचे राष्ट्राध्यक्ष यू मिन आँग लाइंग उच्चस्तरीय शिष्टमंडळासह सध्या भारत दौऱ्यावर असून ते आज मुंबईत व्यवसाय आणि उद्योग क्षेत्रातल्या मान्यवरांच्या भेटीगाठी घेत आहेत. आज सकाळी त्यांचं मुंबईत आगमन झालं, तेव्हा राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं.

**PM-GUJARAT / पूल + डेस्क / तुषार**

गुजरातमधे बारडोली इथं महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या दोन बस एकमेकांना धडकून झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, तर १५ जण जखमी झाले आहेत. बारडोलीतल्या उवा गावात हा अपघात झाला.

या अपघातातल्या जीवितहानीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. अपघातातल्या मृताच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी २ लाख रुपयांची, तर जखमींना ५० हजार रुपयांच्या मदत देण्याची घोषणाही प्रधानमंत्र्यांनी केली आहे.

**IMD – KERALAM/ पूल/ गौरी**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस येत्या गुरुवारच्या आसपास केरळात येऊन थडकेल असा अंदाज भारतीय हवामानशास्त्रविभागाने वर्तवला आहे. लक्षद्वीप बेटं, केरळ आणि तमिळनाडूमधे मोसमी पावसाच्या आगमनासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचं हवामानविभागाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**MEA-VENEZUELA (EARLY) / पूल / तुषार**

व्हेनेझुएलाच्या हंगामी राष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज उद्यापासून ४ दिवसांच्या भारत भेटीवर येणार आहेत. या भेटीत त्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा करतील. यात प्रामुख्यानं ऊर्जा, व्यापार, गुंतवणूक, आरोग्य सेवा, औषध निर्माण आणि नवीकरणीय ऊर्जा या क्षेत्रांमधल्या परस्पर सहकार्याच्या संधीच्या शक्यतांवर चर्चा होईल.

**EL NINO/पूल/राजश्री**

वातावरणात ‘एल निनो’ हा घटक आकाराला येत असून, यंदा जागतिक हवामानावर त्याचा अत्यंत तीव्र प्रभाव पडेल असा इशारा जागतिक हवामान संस्थेनं दिला आहे. तसंच यंदा जून ते ऑगस्ट या कालावधीत 'एल निनो' ची स्थिती निर्माण होण्याची ८० टक्के शक्यता असून, ती नोव्हेंबरपर्यंत कायम राहील असा अंदाज वर्तवला आहे. हवामान बदलामुळे या स्थितीचा प्रभाव अधिक तीव्र होईल, असं हवामान शास्त्रज्ञांनी म्हटलं आहे.

**निट कोठडी/ पूल/ कौस्तुभ**

निट पेपरफुटीप्रकरणातल्या पाच आरोपींच्या न्यायालयीन कोठडीत १५ जूनपर्यंत वाढ करण्याचा निर्णय  दिल्ली न्यायालयाने आज दिला. मंगीलाल खाटीक, विकास बिवल, दिनेश बिवल, यश यादव आणि धनंजय लोखंडे यांच्या कोठडीत वाढ करण्याची मागणी सीबीयाने केली होती, याला विशेष न्यायाधीश न्यायमूर्ती अजय गुप्ता यांनी परवानगी दिली.

या प्रकरणातले इतर आरोपी मनिषा हवालदार, मनोज शिरूरे आणि तेजस हर्षदकुमार यांना न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली. सीबीआयने या प्रकरणी आतापर्यंत तेरा जणांना अटक केली आहे.

**REV.SC JUDGES OATH/पूल/राजश्री**

भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी आज सर्वोच्च न्यायालयाच्या पाच नवीन न्यायाधीशांना पदाची शपथ दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमनं केलेल्या शिफारशीनुसार केंद्र सरकारने न्यायाधीशांच्या नियुक्त्यांना नियुक्त्यांना मंजुरी दिली होती. त्यानुसार, न्यायमूर्ती शील नागू, श्री चंद्रशेखर, संजीव सचदेव आणि अरुण पल्ली यांनी, ज्येष्ठ वकील व्ही. मोहना यांच्यासह सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून शपथ घेतली. 'सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) सुधारणा अध्यादेशाद्वारे सर्वोच्च न्यायालयातल्या न्यायाधीशांची मंजूर संख्या ३४ वरून ३८ पर्यंत वाढवण्यात आली आहे.

**WPI INDEX - PPI/पूल/राजश्री**

केंद्रसरकारने घाऊक किंमत निर्देशांक प्रणाली टप्प्याटप्प्याने रद्द करून, त्याजागी एक सर्वसमावेशक 'उत्पादक किंमत निर्देशांक' प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. देशाच्या चलनवाढ आणि किंमत निर्धारण विषयक माहिती प्रणालीचं आधुनिकीकरण करून, त्याला जागतिक सर्वोत्तम पद्धतींशी सुसंगत करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. सरकारने घाऊक किंमत निर्देशांकात आधारभूत वर्ष २०११-१२ वरून २०२२-२३ पर्यंत सुधारणा करायला मंजुरी दिल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे.

**शिक्षण-पीएमआरसी अर्ज / पूल / अभय**

केंद्रीय उच्च शिक्षण विभागाने प्रधानमंत्री संशोधन अध्यासन योजना २०२६ साठी अर्ज मागवले आहेत. जागतिक भारतीय प्रतिभेला भारताच्या प्रगत संगणन, सेमीकंडक्टर आणि सायबर सुरक्षा यांसारख्या १३ क्षेत्रांमध्ये संशोधन, विकास, नवोपक्रम आणि तंत्रज्ञान परिसंस्थेशी जोडणे या उपक्रमाचा उद्देश आहे. या योजनेची मार्गदर्शक तत्त्वे, पात्रतेचे निकष आणि अर्ज करण्याची प्रक्रिया पीएमआरसीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**ठळक बातम्या पुन्हा एकदा...**

महाराष्ट्रात साडेतीन हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या कामांसाठी ६ हजार ४२९ कोटी रुपयांच्या तरतुदीला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

लाडकी बहीण योजनेत अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांकडून पैसे परत घेणार नसल्याचं मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण

कांद्याला तीन हजार रुपये प्रति क्विंटल हमीभाव आणि इतर मागण्यांसाठी महाविकास आघाडीचं आंदोलन

गुजरातमधे महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या दोन बस एकमेकांना धडकून झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू, १५ जखमी

**आणि**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस येत्या गुरुवारच्या आसपास केरळममधे पोचण्याचा हवामान विभागाचा अंदाज /राज्याच्या चारही विभागांमधे पावसाची शक्यता

**याबरोबरच आकाशवाणी मुंबई केंद्रावरचं हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार...**

**<u>बुलेट – बोगदा/ पीटीआय/ गौरी</u>**

पालघर जिल्ह्यात मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या मार्गावरचा आणखी एक बोगदा आज यशस्वीरीत्या पूर्ण झाला. ४१७ मीटर लांब आणि १४ मीटरपेक्षा जास्त रुंदीच्या या बोगद्याचं खोदकाम डहाणू तालुक्यात अंबेसरी गावात पूर्ण झालं. या मार्गाच्या  बोईसर ते वापी या भागातले  तीन महत्त्वाचे बोगदे गेल्या ५ महिन्यात पूर्ण झाले असल्याचं राष्ट्रीय उच्चवेग रेल्वे महामंडळाने म्हटलं आहे.

**UN MEDAL-PEACEKEEPERS / पूल / गौरी (8.05)**

संयुक्त राष्ट्रांच्या शांतिसेनेतल्या ५६५ भारतीय शांतिरक्षकांना विशेष पदकानं गौरवण्यात आलं. दक्षिण सुदानमधे संयुक्त राष्ट्रांच्या मोहिमेत नागरिकांचं रक्षण आणि शांतता प्रस्थापित करण्यात योगदान दिल्याबद्दल मलाकाल शहरात काल हा पदक प्रदान सोहळा झाला. यात ५३ महिलांचा समावेश होता.

**अमली पदार्थ/पीटीआय/राजश्री**

गुजरातमध्ये अहमदाबाद इथं पोलिसांनी आज केलेल्या कारवाईत ७ किलो 'मेथॅम्फेटामाइन' या अमली पदार्थाची तस्करी उघडकीला आणली. जयपूर इथून अहमदाबाद मार्गे हा साठा मुंबईत घेऊन जाणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतलं. अमली पदार्थांच्या बाजारात या साठ्याचं मूल्य १४ कोटीपेक्षा जास्त आहे. 'मेथ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पदार्थाची विक्री आणि तस्करीवर ‘अमली पदार्थ आणि सायकोट्रोपिक पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत’ बंदी आहे.

**राष्ट्रीय बाल पुरस्कार / पूल / अभय**

महिला आणि बाल विकास मंत्रालयाने 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार' २०२६ साठी अर्ज मागवले आहेत. नामांकन अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ३१ जुलै आहे. पर्यावरण, क्रीडा, कला आणि संस्कृती, तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बालकांना दरवर्षी हा पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते दिला जातो. नामांकन अर्ज awards.gov.in या संकेतस्थळावर स्वीकारले जातील.

**बॅडमिंटन/ PTI + डेस्क / गौरी + तुषार**

इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी.व्ही सिंधूनं दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. थायलंडच्या बुसानान ओंबांरुंहफानला तिनं आज २५-२३,२१-१६ असं पराभूत केलं. मालविका बनसोडला मात्र पहिल्याच फेरीत थायलंडच्या पोर्नपावी चोचुवांग कडून पराभव पत्करावा लागला. पुरुषांच्या गटात किदंबी श्रीकांतही पहिल्याच फेरीत पराभूत झाला. पुरुष एकेरीत लक्ष्य सेनला इंडोनेशियाच्या फरहान यानं २१-१९, २१-१६ असं सरळ गेममध्ये हरवल्यानं त्याचं आव्हानही संपुष्टात आलं.

महिला दुहेरीतही ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीला इंडोनेशियाच्याच कुसुमा आणि मेलिसा या जोडीकडून २१-१४, २१-१२ असं पराभूत व्हावं लागलं.

मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांचं आव्हानही संपुष्टात आलं. चीनच्या गुवो आणि चेन या जीडीनं त्यांना २१-११, २१-१० असं नमवलं.